1. काय आहे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

घरांची ,गावांची व परिसराची स्वच्छता व्हावी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचवावे या उद्देशाने ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत जे कार्यक्रम आखण्यात येतात त्या कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी करून गावातील स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी ग्रामस्थांचा उत्स्फुर्त सहभाग व सहकार्य घेवुन ग्रामिण स्वच्छतेमध्ये सातत्य राखणे.

2. अशी असेल निवड प्रक्रिया

ग्रामपंचायतींनी परिशिष्ट- 1 नुसार आवेदन व माहिती आणि परिशिष्ट-2 नुसार स्वयं मुल्यांकन करुन संबंधित गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांचेकडे सादर करणे.

परिशिष्ट-2 मधील निकषानुसार प्रत्येक जिल्हा परिषद गटातील सर्व ग्रामपंचायतींची तपासणी होवुन गुणांकन होते. जिल्हा परिषद गटस्तरीय अंतिम तपासणी परिशिष्ट-1 मधील माहिती व परिशिष्ट-2 मधील निकषानुसार होवुन त्याचे गुणंकन केले जाते. यामध्ये संबंधित प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या पहिल्या दोन ग्रामपंचायतींची निवड होते.

. जिल्हास्तरीय अंतिम स्पर्धा यामध्ये जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटातील सर्वात जास्त गुण प्राप्त करणाऱ्या फक्त 1 ते 9 ग्रामपंचायतींची निवड केली जाते. परिशिष्ट-1 मधील माहिती व परिशिष्ट-2 मधील निकषानुसार तपासणी होते व गुणंकण केले जाते. या गुणांकणानुसार जिल्हा स्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक दिले जातात. तसेच 3 ग्रामपंचायतींना विशेष पुरस्कार दिले जातात. जिल्हा स्तरावरील प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायती विभास्तरीय स्पर्धेसाठी पात्र होतात.

3. 60 हजारापासुन 50 लाखापर्यंत बक्षिसे

| अ.क्र. | पुसस्कार स्तर | पुरस्कार रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | व्दितीय | तृतीय |
| 1 | जिल्हा परिषद गट | रु.60 हजार | ---- | ----- |
| 2 | जिल्हा स्तर | रु.6 लक्ष | रु.4 लक्ष | रु.3 लक्ष |
| 3 | विभाग स्तर | रु.12 लक्ष | रु.9 लक्ष | रु.7 लक्ष |
| 4 | राज्य स्तर | रु.50 लक्ष | रु.35लक्ष | रु.30 लक्ष |

4. असे असतील विशेष पुरस्कार

| अ.क्र. | पुसस्काराचे नाव | निवडीचे निकष | बक्षिस रक्कम | |
|---|---|---|---|---|
| 1 | स्व. वसंतराव नाईक पुरस्कार- घनकचरा, सांडपाणी व मैला गाळ व्यवस्थापन | शासन निर्णयातील परिश्टि-2 मधील अ.क्र.3,4 व 5 मधील एकुण 56 गुणपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत | जिल्हा स्तर | रु.50,000/- |
| | | | विभाग स्तर | रु.75,000/- |
| | | | राज्य स्तर | रु.3,00,000/- |
| 2 | डॉ. बाबसाहेब आंबेडकर पुरस्क्ार- पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन | शासन निर्णयातील परिश्टि-2 मधील अ.क्र.1 मधील एकुण 34 गुणपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत | जिल्हा स्तर | रु.50,000/- |
| | | | विभाग स्तर | रु.75,000/- |
| | | | राज्य स्तर | रु.3,00,000/- |
| 3 | स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कार- शौचालय व्यवस्थाप | शासन निर्णयातील परिश्टि-2 मधील अ.क्र.2 मधील एकुण 67 गुणपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत | जिल्हा स्तर | रु.50,000/- |
| | | | विभाग स्तर | रु.75,000/- |
| | | | राज्य स्तर | रु.3,00,000/- |

5. सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायतींनी काय करावे.

स्वच्छतेच्या बाबी वैयक्तीक स्वच्छता,शौचालय बांधकाम व वापर,घनकचरा विलगीकरण व व्यवस्थापन,सांडपाणी व्यवस्थापन मासिक पाळी कचरा व्यवस्थापन,मैलागाळ व्यवस्थापन प्लास्टीक कचरा व्यवस्थापन,पाणी पुरवठा व परीसर स्वच्छता या बाबी कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट कराव्यात.

कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाणे सार्वजनिक व वैयक्तीक ठिकाणंची स्वच्छता, मत्तांच्या करावयाच्या दुरुस्त्या व कृती पुर्तता व झालेल्या कामाची SBM- MIS वर नोदी कराव्यात.

- संत गाडेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन 2020-21 21-22 एकत्रीत एक स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायत वाटंगीने विभागस्तरावर व्दितीय क्रमांक पटकाविला आहे.
- संत गाडेबाबाग्राम स्वच्छता अभियान सन 2022-23 मध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायत शेळकेवाडीने विभागस्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला असुन राज्य स्तरीय तपासणी आद्याप प्रलंबित आहे.
- संत गाडेबाबाग्रामस्वच्छता अभियान सन 2023-24 जिल्हास्तरावर ग्रामपंचायत खानापूर तालुका आजरा ने प्रथम क्रमांकमिहवला आहे तसेच गोलीवडे ता. पन्हाळा व हिरलगे तालुका गहिंग्लज यांनी व्दितीय तृतीय क्रमांक मिविला आहे.
- संत गाडेबाबाग्रामस्वच्छता अभियान सन 2024-25 राबविणे बातच्या सुचना तालुकास्तरावर देणेत आल्या आहेत

